# ' वसुंधरा पुरस्कार ' २०१०

## महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ पुरस्कृत

शाळा आणि पर्यावरण विषयक स्वयंसेवी
संस्था ह्यांच्यासाठी मार्गदर्शक पुस्तिका

मे २०१०

१.०- पार्श्वभूमी

स्थानिक स्वराज्य संस्था , शाळा ,आणि पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्थांनी महाराष्ट्रातल्या पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने केलेल्या अनुकरणीय कार्याची दखल घेतली जावी या साठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने ( म. प्र.नि .मं .) २००९ साली वसुंधरा पुरस्कारांची सुरुवात केली.

२.० उद्देश

अ) उद्योगधंदे, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा आणि पर्यावरण विषयक स्वंयसेवी संस्था यांनी चिरंतन विकासाकरिता दिलेले वैशिष्टयपूर्ण योगदान आणि उद्योगवाद , सेवा , कार्य आणि सामाजिक उद्दिष्टे संभाळताना पर्यावरण रक्षणाच्या कामात त्यांनी केलेल्या भरीव प्रगतीची दखल घेणे.

आ) भारतीय उद्योगधंदे, स्थानिक स्वराज्य, संस्था, शाळा आणि पर्यावरणविषयक स्वयंसेवी संस्थांसमोर मापदंड उभा करून त्यांना प्रोत्साहित करणे.

इ) केवळ आवश्यक नियमांपुरता विचार न करता चिरंतन विकासाच्या मार्गाने जागतिक पातळीवरील सर्वोत्कृष्ट पर्यायांचा पुरस्कार करणे.

३.० या पुरस्काराचे विभाग कोणकोणते आहेत ?

म.प्र.नि.मं. ने 'वसुंधरा' पुरस्कारासाठी ढोबळ मानाने ४ विभाग निश्चित केले आहे.

१. उद्योगधंदे - उद्योगधंदे या विभागात २ उपविभाग आहेत .

मोठे उद्योगधंदे (१० कोटीहूनअधिक भांडवली गुंतवणूक (* ) असलेले )

लघुतम , लघु आणि मध्यम उद्योगधंदे (१० कोटी पर्यंत गुंतवणूक (*) असलेले

(*) टीप - स्थावर व यंत्र सामग्री यांच्यासाठी केलेली भांडवली गुंतवणूक

संदर्भ - दि २९ सप्टेंबर २००९ चे लघु उद्योग मंत्रालय , भारत सरकार चे सूचनापत्र

२. स्थानिक स्वराज्य संस्था - स्थानिक स्वराज्य संस्था या विभागात २ उपविभाग आहेत

अ) महानगर पालिका

आ) नगर परिषद आणि कंटोन्मेंट बोर्ड

उपरोल्लेखित विभागात सादर झालेले अर्ज आणि गुणांकन पध्दती यानुसार विजेत्यांच्या नांवांची घोषणा २२ एप्रिल २०१० रोजी वसुंधरा दिनी केली गेली

३. शाळा

शाळा या विभागात २ उपविभाग आहेत

अ) शासकीय / नगरपालिका शाळा

आ) खासगी शाळा

४. पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्था -

पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्था या विभागात २ उपविभाग आहेत .

अ) स्वयंसेवी संस्थांकडून शहरी भागात चालवलेले उपक्रम / प्रकल्प

आ) स्वयंसेवी संस्थांकडून ग्रामीण भागात चालवलेले उपक्रम / प्रकल्प

| |
|---|
| ही मार्गदर्शक पुस्तिका शाळा आणि पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्था या विभागातील अर्जदारांकरिता आहे. |

४.० ह्या पुरस्काराचे स्वरूप कसे आहे ?

अ) एका मोठ्या जाहीर समारंभात किंवा कार्यक्रमात हा पुरस्कार दिला जाईल . (त्याची सर्वत्र दाखल घेतली जाईल .)

आ) स्मृतीचिन्ह / सन्मानचिन्ह आणि मानपत्र

इ) रोख पारितोषिक

म.प्र.नि.मं. कडून प्रत्येक विभागाकरिता ३ पुरस्कार दिले जातील.

५.० ह्या पुरस्काराचे वितरण कधी होईल ?

शाळा आणि पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्था या विभागातील पुरस्कार ३१ ऑगस्ट २०१० रोजी घोषित होतील आणि चारही विभागांच्या (उद्योगधंदे ,स्थानिक स्वराज्य संस्था , शाळा , पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्था) पारितोषिकांचे वितरण म.प्र.नि.मं.च्या स्थापना दिनी म्हणजेच ७ सप्टेंबर २०१० रोजी होईल .

६.० ह्या पुरस्कारासाठी पात्रता निकष कोणते आहेत ?

शाळा

- सरकारमान्य शाळा
- कोणत्याही इयत्तेपासून अधिकतम १२वी इयत्तेपर्यंत शिक्षण देणा-या शाळा .
- महाराष्ट्रात चालणाऱ्या किंवा महाराष्ट्रात शिक्षण सुविधा असणा-या शाळा

पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्था

- न्यास संस्था किंवा कलम २५ अंतर्गत असलेल्या आस्थापना म्हणून ज्या पर्यावरणाविषयक संस्था शासन दरबारी नोंदणीकृत आहेत.
- चिरस्थायी विकास, वातावरण बदल, पर्यावरणातील घटक (हवा,पाणी,जैववैविध्य, जमीन इ.)
  कचरा व्यवस्थापन,पर्यावरणातील समस्यांमूळे सर्व सामान्यांच्या आरोग्याबाबत उदभावणा-या समस्या,
  आपत्ती व्यवस्थापन आणि पर्यावरण विषयक अन्य विषय या क्षेत्रात किमान ३ वर्षपासून कार्यरत असणा-या पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्था.
- एका पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्थेच्या एकाच उपक्रम / कार्यक्रमाचा यात अंतर्भाव होऊ शकतो
- अर्जात नमूद केलेला प्रकल्प / कार्यक्रम महाराष्ट्रात चालवला गेलेला असावा
- ज्या पर्यावरण विषयक संस्थांचे मान्यताप्राप्त सनदी लेखापालकडून नियमितपणे लेखापरीक्षण होते व त्यांचा गेल्या सलग तीन वर्षांचा (२००७,२००८,२००९) लेखा अहवाल तयार असेल अशा संस्था .

७.० पूरस्कार व्यवस्थापन यंत्रणा

म.प्र.नि.मं. ने या पुरस्काराच्या व्यवस्थापनासाठी लागणा-या सहकार्यासाठी Environmental Management centre ची नेमणूक केली आहे .
www.emcentre.com

७.१ तांत्रिक समित्यांची निर्मिती

प्रत्येक विभागासाठी म.प्र.नि.मं. ने मान्यवर व्यक्तींचा सहभाग असलेल्या तांत्रिक समितीची निर्मिती केली आहे . म.प्र.नि.मं. आणि Environmental Management Centre च्या सहकार्याने या सामित्यांमधील सदस्य , अर्जाचे गुणांकन करतील व पुरस्कारासाठी शिफारस करतील

७.२ मूल्यांकन प्रकिया

खालील तीन स्तरांवर अर्जाचे मूल्यांकन केले जाईल.

स्तर १ - प्राथमिक मूल्यांकन

पात्रता निकषानुसार अर्जाची छाननी

पूर्तता तपासणी पूर्णपणे भरलेले अर्जच ग्राह्य धरले जातील.

गुणांकन प्रक्रियेनुसार प्राथमिक मूल्यांकन

विस्तृत मूल्यांकनासाठी योग्य अर्जाची निवड

स्तर २- विस्तृत मूल्यांकन

निवडलेल्या अर्जदारांना मुलाखतीसाठी आणि तांत्रिक समितीसमोर सादरीकरणासाठी बोलवले जाईल .यातून अंतिम यादीची निश्चिती होईल

स्तर ३- अंतिम मूल्यांकन सत्यता पडताळणीसाठी व अधिक माहिती साठी प्रकल्प स्थानांना प्रत्यक्ष भेट देणा-या गटात तांत्रिक समिती म.प्र.नि.मं. व Environmental Management Centre यातील सदस्यांचा अंतर्भाव असेल.

## ८.० मूल्यांकनाचे निकष

शाळा आणि पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्था या दोन विभागांसाठी मंडळाने निश्चित केलेले मूल्यांकन निकष पुढील प्रमाणे

### ८.१ शाळांसाठी मूल्यांकन निकष

शाळांचे गुणांकन मंडळाने निश्चित केलेल्या पुढील निकषांनुसार होईल

१. शाळेतल्या पायाभूत सोयीसुविधा
- १.१ मोकळी जागा आणि तिचा वापर
- १.२ स्वच्छता ,कचरा व्यवस्थापन, आरोग्य आणि सांडपाणी व्यवस्था यांसाठी उपलब्ध सुविधा आणि साधन सामग्री
- १.३ पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था
- १.४ इमारत व वर्ग खोल्या यांची स्थिती (जागा , अग्निशमनासाठी सुरक्षा), वातावरण (उजेड , खेळती हवा इ.)

२. कचरा व्यवस्थापन, साधन सामग्रीचे संवर्धन , हरित व्यवस्थापनाच्या सवयी
- २.१ घनकचरा व्यवस्थापन , कच-यातील कपात, पुनर्वापर
- २.२ पाणी आणि वीज यांचे संवर्धन
- २.३ गृह व्यवस्थापन आणि स्वच्छता
- २.४ शाळा परिसरचे हरितीकरण आणि सुशोभन (बागा)
- २.५ तत्पर आणि पर्यावरणस्नेही वाहतूक व्यवस्था

३. पर्यावरण विषयक ज्ञान, प्रशिक्षण आणि जागरूकता
- ३.१ शिक्षकांसाठी प्रशिक्षण आणि जागरूकता कार्यक्रम
- ३.२ रितसर अभ्यासक्रमातून शिक्षण
- ३.३ शाळा बाह्य कार्यक्रमांतून शिक्षण
- ३.४ पर्यावरण विषयक संवाद / जोड कार्यक्रम / पालकाशी आणि समाजघटकांशी संवाद
- ३.५ संबंध आणि सहयोगिता (पार्टनरशीप)

४. हरितीकरणासाठी स्वयंस्फुर्ती आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रम

उदा. पर्जन्य जल संधारण, गांडूळखत प्रकल्प, सौरऊर्जेचा वापर, पर्यावरण मंडळे, इत्यादी.

८.२ पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्थांसाठी मूल्यांकन निकष

पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्थांचे गुणांकन मंडळाने निश्चिती केलेल्या पुढील निकषांनुसार होईल

१. संस्थागत सक्षमता

- १.१ क्षमता (मनुष्य बळ)
- १.२ कर्मचा-याची क्षमता वाढ ( ज्ञान , प्रशिक्षण , जागरूकता इ .बाबतीत)
- १.३ उत्तरदायित्व आणि पारदर्शकता यांना प्रोत्साहन ( कार्यवृत्त अहवाल प्रकाशन , वार्षिक कार्य अहवाल , लेखा अहवाल यांचे प्रकाशन )
- १.४ सामाजिक आणि सांस्कृतिक विविधतेचा स्वीकार आणि प्रतिक्रियात्मक दृष्टीकोन / सामाजिक घटकांना सामावून घेण्याची तरतूद आणि प्रक्रिया

२. प्रकल्पाचा संदर्भ आणि समर्पकता

- २.१ प्रकल्पाचे औचित्य / समर्पकता
- २.२ पुढाकारातली तत्परता
- २.३ स्थानिक संदर्भानुसार प्रकल्पातली नाविन्यपूर्णता
- २.४ प्रकल्पाचे चिरस्थायित्व

३. प्रकल्पाचे परिणाम आणि परिणामकारकता

उदाहरणार्थ :- संख्यात्मक सुधारणा /प्रदुषणातील घट / पर्यावरणीय आरोग्यातील सुधारणा , लाभार्थींची टक्केवारी, ज्ञान आणि जागरूकता यांचा प्रसार, नैसर्गिक साधनांचे व त्यांच्या पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन, पुर्ननिर्माण आणि बदल स्वीकारण्याची क्षमता

९.० नियम व कायदे

१. माहिती भरताना नेमकेपणा ठेवावा.

२. गेल्या तीन दिनदर्शिका वर्षातील माहिती द्यावी .

३. आवश्यकता भासल्यास अतिरीक्त कागद जोडावेत .

४. तांत्रिक समितीच्या शिफारशीनुसार म.प्र.नि.मं.ने दिलेला निर्णय हा अंतिम असेल आणि त्यावर कोणताही प्रतिवाद किंवा पत्रव्यवहार याची दाखल घेतली जाणार नाही .

५. अर्जदाराने तांत्रिक समितीला दिलेल्या माहितीची कोणतीही जबाबदारी म.प्र.नि.मं. स्वीकारणार नाही .मात्र म.प्र.नि.मं ही माहिती गोपनीय ठेवण्याची योग्य ती तरतूद, तांत्रिक समितीशी केलेल्या करारनाम्याव्दारे करेल.

६. सर्व पूर्ण भरलेले अर्ज , योग्य कागदपत्रांसह दोन प्रतीमध्ये जमा करावेत .

७. अर्जा सोबत जोडावयाचे साहित्य एकाच वेळी जमा करावे .

८. अर्जा सोबत जोडलेले साहित्य परत केले जाणार नाही .

९. पुरस्काराच्या निकषांमध्ये , आवश्यकता भासेल तेव्हा आवश्यक आणि समर्पक बदल करण्याचा अधिकार म.प्र.नि.मं.आणि तांत्रिक समिती आपल्याकडे राखून ठेवत आहे .

१०. तांत्रिक समितीच्या सदस्यांवर कोणत्याही प्रकारे दबाव किंवा अतिरिक्त प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्यास तो अर्ज रद्द बातल करण्यात येईल.

११. निवड केलेल्या अर्जदारांना तांत्रिक समितीसमोर, सादरीकरणासाठी निमंत्रित केले जाईल .

१२. सत्यता पडताळणीसाठी आणि अधिक संवादासाठी, अंतिम फेरीत निवड झालेल्या अर्जदारांच्या प्रकल्पस्थानाला, म.प्र.नि.मं.चे कर्मचारी , तांत्रिक समितीचे सदस्य आणि Environmental Management Centre चे सदस्य भेट देऊ शकतील .

१३. अर्ज सादरीकरण , अर्जा सोबत जोडावयाचे साहित्य , परीक्षक / तांत्रिक समितीचे सदस्य , मूल्यांकन समिती सदस्य यांचे बरोबर वेळोवेळी केलेल्या सादरीकरणा साठी किंवा पारितोषिक स्वीकारण्यासाठी झालेला प्रवास या सर्वांचा खर्च अर्जदाराने वैयक्तिकरीत्या करायचा आहे .

१०.० गोपनीयता आणि विश्वासार्हता

अर्जदारांची नावे , माहिती ,तपशील , आणि मूल्यांकनाचे निकाल पूर्णपणे गोपनीय राखले जातील . ही माहिती केवळ , तांत्रिक समितीचे सदस्य व मूल्यांकन प्रक्रियेत थेट सहभागी असलेल्या अधिका-यानाच दिली जाईल .या माहितीचा कोणत्याही तपास प्रक्रियेसाठी अथवा खटल्यासाठी वापर केला जाणार नाही .

या पुरस्काराच्या विजेत्या अर्जदारांच्या उल्लेखनीय कार्यपद्धतीवर आधारित एक संक्षिप्त ग्रंथ प्रकाशित करण्याचा म.प्र.नि.मं चा मानस आहे . विजेत्या अर्जदारांशी चर्चा करून आणि त्यांचा मान्यतेनंतर ही माहिती या ग्रंथासाठी वापरली जाईल .

११.० सहभागिता शुल्क

कोणत्याही विभागात अर्ज करण्यासाठी अथवा सहभागासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही .

१२.० सहभागिता अर्ज

म.प्र.नि.मं च्या http://www.mpcb.gov.in या संकेतस्थळावरून कृपया सहभागिता अर्ज डाउनलोड करून घ्यावा .

पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक संदर्भपत्रांसह दोन प्रतीमध्ये जमा करावेत

१३.० अर्ज भरण्याची अंतिम दिनांक

| अनु क्र. | विभाग | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | शाळा | ३०.०६.२०१० |
| २. | पर्यावरण विषयक स्वयंसेवी संस्था | ३०.०६.२०१० |

अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१४.० पत्र व्यवहाराकरिता पत्ता

पूर्ण भरलेले २ प्रतीतले अर्ज पाकिटावर वसुंधरा पुरस्कार २०१० असे लिहून मोहोरबंद करून खालील पत्त्यावर पाठवावेत.

सदस्य सचिव<br>
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ<br>
कल्पतरू पॉईट ,३ रा मजला<br>
सिनेप्लॉनेट समोर,सायन सर्कलजवळ,<br>
शीव (पू) मुंबई-४०००२२

अधिक माहिती किंवा मदतीसाठी अर्जदारांनी कृपया खालील ठिकाणी संपर्क साधावा.

श्री संजय भुस्कुटे<br>
जन संपर्क अधिकारी<br>
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ<br>
कल्पतरू पॉईट ,३ रा मजला<br>
सिनेप्लनेट समोर,सायन सर्कलजवळ,<br>
शीव (पू) मुंबई-४०००२२<br>
दूरध्वनी क्र : (०२२) २४०२०७८१ / २४०१०४३७<br>
भ्रमणध्वनी क्र : ९८६९४४०१८५